३ ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल, सर्व ग्राहकांचे आभार!
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

पेस्ट कंट्रोल
झुरळ, ढास, मुंग्या, कोळी, पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुण इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक २८५ वा ● शुक्रवार, ता.११ एप्रिल २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

रयत समाचार पोर्टल
Scan QR Code
रयत समाचार चॅनल
Scan QR Code
इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी
Scan QR Code

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

१ एप्रिल २०२५ पासून पुर्णवेळ आपल्यासेवेत...
श्रीलक्ष्मी होमिओपॅथिक क्लिनिक
डॉ. विद्या गायकवाड | 7588092673
वेळ : सकाळी ११ ते दुपारी ३, संध्याकाळी ५ ते रात्री ९
पत्ता : दर्पण बिल्डिंग, श्रीपाद मेडिकलच्यावर, शनी-मारुती मंदिराशेजारी, दिल्लीगेट वेशीच्या बाहेर, अहिल्यानगर-४१४००१
कृपया, फोन करुन येणे
सर्व आजारांवर होमिओपॅथिक औषधोपचार केले जातील
आजाराचे निदान व समुपदेशन केले जाईल

# कर भरणे ही समाजसेवा आहे, सर्वांनी तो अवश्य भरला पाहिजे

## राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी व्यापाऱ्यांचे टोचले कान

**मुंबई । प्रतिनिधी**

अर्थसंकल्प जाहीर झाला की बहुतांशी लोक व व्यापारीवर्ग आयकराबद्दल बोलत असतात. आपण कर भरला नाही तर देशाच्या सीमेवरील जवानांची काळजी घेता येणार नाही तसेच रस्ते महामार्ग बांधणे इत्यादी जनहिताची कामे करता येणार नाही. प्रामाणिकपणे कर भरणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे तसेच कर भरणे ही समाजसेवा आहे, त्यामुळे सर्वांनी कर अवश्य भरला पाहिजे, असे सांगत राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी कान टोचले. महावीर जयंतीनिमित्त भारत जैन महामंडळ या संस्थेतर्फे आयोजित 'महावीर स्वामी जन्म कल्याणक' महोत्सव राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत योगी सभागृह मुंबई येथे संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.



मृत्यू अटळ आहे, हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. भौतिक सुखाला कधीही सीमा नसते. कितीही पैसे कमवा, घरे बांधा, बँक ठेवी जमा करा, परंतु त्यामुळे समाधान होणार नाही. त्यामुळे जीवन समाजासाठी व लोकसेवेसाठी व्यतीत केले पाहिजे असे राज्यपालांनी यावेळी सांगितले. जैन धर्माने शाकाहारी जीवनपद्धतीला महत्व दिले आहे. शाकाहारी भोजनामुळे मनुष्याचे विचार परिवर्तन होते याचा आपण व्यक्तिशः अनुभव घेतला आहे असे सांगून सन २००० साली आपण संपूर्ण शाकाहारी झाल्यापासून आपल्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडले असे राज्यपालांनी यावेळी सांगितले. एके काळी तामिळनाडू राज्यातील दोन तृतीयांश लोक भगवान महावीरांची शिकवण पाळत होते. तामिळ भाषेतील पाच महाकाव्यांपैकी दोन महाकाव्ये जैन मुनींनी लिहिली आहेत असे सांगून जैन धर्माचा देशाचा जनमानसावर मोठा प्रभाव असल्याचे राज्यपालांनी सांगितले. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी अहिंसेचा पुरस्कार करताना दुष्ट प्रवृत्तींना शासन करणे देखील महत्त्वाचे असते असे सांगितले. केंद्र शासनाच्या प्रयत्नामुळे अतिरेकी तहव्वूर राणा याचे भारतात प्रत्यार्पण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र शासनाने नक्षलवादाचे उच्चाटन करण्याचा विडा उचलला असून पुढील वर्षी मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवादाचे समूळ उच्चाटन केले जाईल असे त्यांनी सांगितले. देशातील १६० जिल्ह्यांपैकी आज केवळ १२ जिल्ह्यांमध्ये नक्षलवाद शिल्लक असल्याचे त्यांनी सांगितले. दिनांक ९ एप्रिल रोजी विश्व नवकार महामंत्र दिवस साजरा करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जल संवर्धन, मातेच्या नावाने वृक्षारोपण, स्वच्छतेचा पुरस्कार, स्थानिक उत्पादनांना चालना, देश भ्रमण, नैसर्गिक शेती, निरामय जीवनशैली, योग व खेळाचा पुरस्कार व गोरगरिबांची मदत ही नवसूत्री दिली असे सांगून ही नवसूत्री देशाला समृद्ध करेल असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी आचार्य नयपद्मसागर यांनी मुंबईतील १५०० सार्वजनिक शाळांना नवसंजीवनी देऊन तेथील लाखो गरीब मुलांना मोफत भोजन, शिक्षण, कौशल्य शिक्षण व संस्कार देण्याचा संकल्प सोडला.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते भारत जैन महामंडळ संस्थेच्या १२५ व्या वर्धापन दिनानिमित्त काढलेला 'जैन जगत' विशेषांक प्रकाशित करण्यात आला. कार्यक्रमाला जैन साध्वी प्रियंवदा, राज्य विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, खासदार मिलिंद देवरा, जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, लोकमत समूहाचे अध्यक्ष विजय दर्डा, भारत जैन महामंडळ संस्थेचे अध्यक्ष सी.सी. डांगी, माजी अध्यक्ष तसेच जैन समाजातील मान्यवर उपस्थित होते.



# खडतर परिश्रमाच्या आधारे जीवनाचे ध्येय गाठता आले- आपटेकर

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

लहानपणी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन व्यतीत केले. अनेक आणि अडचणींचा सामना करत शिक्षण घेतले. नोकरीसाठी ही मोठे कष्ट घ्यावे लागले. प्रसंगी पडेल ती कामे स्वीकारली. वडीलांच्या एका फटक्यामुळे व्यायामाचा कानमंत्र स्वीकारला. व्यायामातून व्यक्तिमत्व सुधारले. जगण्याचा आत्मविश्वास मिळाला.

खडतर परिश्रमाच्या आधारे जीवनाचे ध्येय गाठता आले असे प्रतिपादन, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शरीर सौष्ठवपटू सुनील आपटेकर यांनी बोलताना केले. बेळगावचे सुपुत्र, मिस्टर इंडिया किताब विजेते सुनील आपटेकर हे आपल्या ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर रेल्वे खात्यातून निवृत्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांनी आज गुरुवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी पुढे बोलताना आपटेकर पुढे म्हणाले, घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची. अशाही परिस्थितीत शिक्षण घेतले. पुढे अनेक ठिकाणी मिळेल ती कामे करत गेलो. मिलिटरीत भरती होण्यासाठी गेलो असताना काटकुळ्या शरीर यष्टीमुळे सैन्यात नोकरी मिळाली नाही. त्यावेळी आलेली निराशा पाहून वडिलांनी व्यायामाचा कानमंत्र दिला. वडिलांच्या मार्गदर्शनानुसार नियमितपणे व्यायाम करू लागलो. व्यायामातून व्यक्तिमत्व सुधारले. जगण्याचा आत्मविश्वास वाढला. विविध पातळीवरील स्पर्धेत भाग घेऊ लागलो. स्पर्धा जिंकत गेलो. हिंदुस्तान लेटेक्स, साउथ सेंट्रल मध्ये हंगामी स्वरूपात नोकरीही केली. पुढे जाऊन रेल्वेच्या क्रीडा कोट्यातून भविष्य घडविण्याचा ध्यास घेतला.अथक निरंतर प्रयत्न केले. त्यातून रेल्वेत कायमची नोकरी मिळाली. रेल्वेत भरती झाल्यानंतर पहिल्याच प्रयत्नात ऑल इंडिया रेल्वे चॅम्पियनशिप बहुमान पटकावला. त्यातून आत्मविश्वास वाढला. राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धा भाग घेतला. अनेक स्पर्धा जिंकल्या. ३५- ४० वर्षांपूर्वीचा काळ वेगळा होता त्याकाळी बेळगावच्या होतकरू गुणवान व्यायामपटूंना योग्य ते मार्गदर्शन मिळत नव्हते. याकडे लक्ष देऊन माझ्याबरोबरच इतरांनीही जीवनात यश मिळवावे यासाठी मार्गदर्शन करू लागलो. सातार्‍यापासून दावणगिरी पर्यंतच्या शाळा कॉलेजांमध्ये मधील विद्यार्थ्यांना व्यायामाचे घडे दिले.

रेल्वेत प्रामाणिक आणि तन्मयतेने सेवा बजावली. त्यामुळेच झोनल स्कोड चीफ पदाची संधी मिळाली. रेल्वे विभागात गुणवान खेळाडूंना चांगल्या संधी आहेत. याबाबत मित्रांनाही नेहमी मार्गदर्शन करत राहिलो. तरुण पिढीने व्यसनांच्या आहारी न जाता व्यायामाची आवड लावून घ्यावी. पैसे मिळवण्याच्या नादात,शरीराकडे दुर्लक्ष होऊ नये याची विशेष काळजी घ्यावी. खेळाडूंनी उत्तेजक द्रव्य आणि औषधांचे सेवन टाळावे.अन्नाचे नीट पचन हेच खरे फिटनेस रहस्य आहे. प्रत्येकाने किमान एक तास दररोज व्यायाम करावा. बेळगाव परिसरात अनेक गुणवान खेळाडू आहेत.यामधील खेळाडूंनी ऑलिंपिक पर्यंत मजल मारावी. यासाठी आपले पुढील काळात प्रयत्न राहणार आहेत. असेही आपटेकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

# महात्मा फुलेंचा शोध निर्मिकाचा

**या जगात सर्वप्रथम कोण अवतरलं? मानव की ईश्वर?**
**समूह : मानव. मग ईश्वराची निर्मिती कोणी केली?**
**समूह : मानवाने. मग ईश्वर श्रेष्ठ का मानव श्रेष्ठ ?**
**समूह : मानव श्रेष्ठमानव श्रेष्ठ**

जर का मानवाने ईश्वराची निर्मिती केली आहे तर ईश्वराच्या नावाने लढाई का करावी ? सध्याच्या विज्ञानयुगात देव आधी का माणूस आधी ? हा विचार करायला कोणीच आपल्या बुद्धीला ताण देत नाही. आजही तो गोंधळलेल्या अवस्थेतच आहे. ११ एप्रिल ते १४ एप्रिल फुले आंबेडकरी महोत्सव. त्यांच्या जयंत्या करण्यातच सगळे दंग आहेत. त्यांचे विचार डोक्यात घेण्याऐवजी त्यांनाच डोक्यावर घेऊन लोक नाचत आहेत. साऊंडच्या मोठमोठ्या भिंती उभ्या करून डी.जे. स्पीकर लावून मिरवणुका काढल्या जात आहेत. या मिरवणुकीसाठी सत्ताधारी पक्ष मंडळांना भरमसाठ वर्गण्यात येत आहेत. मिरवणुका काढणारे आनंदी, तर त्या कर्कश्य आवाजामुळे आणि ट्रॅफिकच्या गर्दीत अडकलेली मंडळी नाक मुरडत आहे. पुढाऱ्यांची भाषण, हारतुरे घोषणा यामुळे सारा परिसर दणाणून गेलेला आहे. बौद्धांनी फुले हायजॅक केले, अशाही चर्चांना उधाण आले आहे. परंतु आज महात्मा फुले किती जणांनी वाचले ? किती जणांनी समजून उमजून घेतले ? आणि त्यांच्या विचारांवर कितीजण पावलावर पाऊल ठेवून चालले आहेत ? याची चिकित्सा होणार की नाही? धर्म चिकित्सा करणारे आधुनिक भारताचे प्रमुख शिल्पकार सत्यशोधक समाज क्रांतिकारक महात्मा ज्योतिराव फुले यांची आज जयंती. (११ एप्रिल १८२७ - २८ नोव्हेंबर १८९०) महात्मा फुले शिक्षण तज्ञ, अर्थतज्ञ, आधुनिक नाटककार, निबंधकार, आद्य शिवचरित्रकार, आधुनिक मराठी कवितेचे जनक, पुण्याचे आयुक्त, पुणे कमर्शियल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनीचे कार्यकारी संचालक म्हणून ते ओळखले जातात. त्यांचे हे सगळे कार्य म्हणजे मानवमुक्तीचा जाहीरनामाच आहे. महात्मा फुले यांनी गुलामगिरी, तृतीय रत्न नाटक, छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा, ब्राह्मणाचे कसब, शेतकऱ्यांचा आसूड, अस्पृश्यांची कैफियत, अखंड काव्यरचना सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक असे अनेक प्रकारचे साहित्य लिहिले. हे सर्व साहित्य स्त्री पुरुष समानता, जाती निर्मूलन, ज्ञान निर्मिती, धर्मचिकित्सा, सामाजिक न्याय, आंतरजातीय विवाह, शिक्षण प्रसार आणि प्रचार यावर आधारित आहे. महात्मा फुले यांनी आपले साहित्यातून व आपल्या कृतीतून लोकांच्या डोळ्यात अंजन घातले महात्मा फुले आपल्या अखंडात म्हणतात.




कुमार आहेर
९८९०६०४१३७
kumaraher19@gmail.com
प्रासंगिक

आता तरी मागे येऊ नका धिक्कारून टाका ती मनस्मृति विद्या शिकताच पावेल ते सुख घ्यावा माझा लेख ज्योती म्हणे ।। समाजाला सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक स्वातंत्र्य नव्हते ब्राह्मणवर्गाचे वर्चस्व होते. या सामाजिक हक्कांसाठी, सर्व बहुजनांनी बंडाचे हत्यार उचलावे असा महात्मा फुले यांचा हेतू होता. हा हेतू साध्य करण्यासाठी त्यांनी आपल्या कला कौशल्याने आपल्या साहित्यातून, कृतीतून प्रबोधन केले. पण हे सामाजिक प्रबोधन करत असताना किंवा ही भटशाही नाकारताना समाजाला पर्याय देणे गरजेचे असते आणि हाच पर्याय महात्मा फुले यांनी, भारतातील ही धर्म व्यवस्था नाकारून २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथात त्यांनी देवाला निर्मिक म्हटले आहे. त्यांनी निर्मिती या नव्या संकल्पनेची मांडणी केली आहे. ही निर्मिक संकल्पना कोणत्याही विशिष्ट धर्मग्रंथावर आधारित नसून संपूर्ण सृष्टीच्या उगमाशी संबंधित आहे. हा निर्मिक कोणालाही उच्च- नीच मानत नाही. कोणावरही अन्याय करत नाही. सर्वांवर समतेने कृपा करतो. ही संकल्पना त्यांच्या पुरोगामी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून साकार होत गेली होती. म्हणूनच महात्मा फुले आपल्या खंडात म्हणतात.धर्मराज्य भेद मानवा नसावे सत्याने वागावे ईशासाठी ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मण ,यांना धरावे उराशी बंधुपरी निर्विकाचा धर्म सत्य आहे एक मग भांडणे अनेक कशासाठी यावरून त्यांचा सत्यशोधक समाज हा विश्वाशी मंगल मैत्री करणारा होता. विश्वबंधुत्वाचा होता. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यावर आधारित होता. महात्मा फुले संपूर्ण आयुष्यभर सत्यासाठीच लढले. सत्यासाठीच त्यांनी चिंतन, मनन करून कृतिशील कार्य केले आणि या सर्वांचा परिपाक म्हणजेच त्यांच्या अनेक पुस्तकांपैकी सर्वात शेवटचे त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झालेले पुस्तक म्हणजेच, सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक. ते आपल्या १ एप्रिल १८८९ रोजी लिहिलेल्या प्रस्तावनेमध्ये म्हणतात की, मला विस्तृतपणे लिहायचे होते. परंतु एकंदर सर्व

(पान ४ वर)

# आदर्श विसरू नये म्हणून

हल्ली आपण फार अपडेट आणि मॉडर्न झालो आहोत. इतके अपडेट आणि मॉडर्न झालो आहोत की, घरात असलेल्या आईवडील, आजीआजोबा यांनी आपले संपूर्ण आयुष्य सुखमय बनवण्यात घालवले. त्यांची विचारपूस करण्यासाठी, त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी, त्यांचे अनुभव जाणून घेण्यासाठी आपल्याकडे वेळच उरलेला नाही ? खरंतर येत्या काही दिवसांमध्ये एक पिढी हे जग सोडून जाणार आहे. हे सत्य आपल्याला स्वीकारायला हवे. त्याचबरोबर सहज मनात येऊन गेले की, आपणही एक शेवटची पिढी आहोत की, ज्यापिढीचे आई-वडील आजीआजोबा हे फेसबुकवर किंवा कोणत्याही सोशल मीडियावर नाहीत. ही पिढी म्हणजे आपल्या विचारांवरती ठाम असलेली. अनेकदा आपण प्रवास करतो. माणसांची नुसती गर्दी व तीही चैनीच्या गोष्टी मिळवण्यासाठी रोज धावताना दिसतात. अर्थात त्यात मी ही एक. अनेकदा कोणासोबत वाद होतो, तर कधीकधी हसीमजाक करत करत हा प्रवास कधी संपतो माहीतच पडत नाही. असाच अहमदनगर ते पुणे हा माझा त्या दिवशीचा प्रवास. धावपळ करत बसस्थानकावर पोहोचलो. डोळे रिकाम्या बाकाचा शोध घ्यायला लागले. काही वेळ निघून गेल्यानंतर पुण्याला जाणारी बस आली. बसमध्ये चढलो, जागासुद्धा मिळाली. माझ्या बाजूच्या सीटवर एक म्हातारी आजी येऊन बसल्या. या आजी म्हणजे वय वर्ष साधारण ७० ते ८० च्या वयामधील. मी फक्त त्यांचे निरीक्षण करत राहिलो. बस सुरू होऊन स्थानकाबाहेर पडली. आपल्या मोबाईलमध्ये त्या आजीने हरिपाठ, अभंग अशा गोष्टी लावलेल्या, मोठ्या आवाजात आजी ते भजन आपल्या कानाजवळ घेऊन ऐकत होत्या. जवळजवळ एक तास आजी तुकोबांचे ज्ञानेश्वरांचे अभंग ऐकत होत्या. मोठमोठ्याने गातसुद्धा होत्या. मी सुध्दा तल्लीन होऊन ते ऐकत होतो. अनेकदा या धकाधकीच्या जीवनात आपण स्वतःसाठी वेळ काढायला विसरून जातो किंवा आपल्याला काय हवे हे विसरून जातो. अनेकदा आपल्या सभोवताली अशा अनेक गोष्टी घडत असतात ज्यातून आपण खूप काही शिकू शकतो, परंतु आपण तो विचारच करत नाही. कुठेतरी म्हटलेच आहे ना घरात हसरे तारे असतात, मी पाहू कशाला नभाकडे. गावाकडे हरिपाठ, कीर्तन, भजन, सकाळची काकडआरती सहज ऐकायला मिळते. पुण्यासारख्या धावपळीच्या शहरात कीर्तन, भजन, हरिपाठ, सकाळची काकड आरती किंवा स्वतःला काय हवे, स्वतःला काय आवडते याकडे फारसे लक्ष कोणी देत नाही. परंतु आजी मात्र निराळ्याच...कदाचित माझ्या पिढीला माहीत असेल पण माझ्या पुढच्या पिढीला तर लक्षातही राहणार नाही. त्यामुळे आपण एक दुर्मिळ गोष्ट आता हरवतोय की काय असे वाटू लागले. येणारा काळ हा नक्कीच चांगला असेल. अनेक गोष्टी सोयीस्कर आणि सोप्या होतील परंतु स्वतःसाठी आणि इतरांसाठी जगणारी ही पिढी मात्र लुप्त होणार हे तितकेच खरं. प्रयत्न करू या या पिढीकडून मिळालेला आदर्श पुढे आपण घेऊन जाऊ या. स्वतःला काय हवे. स्वतः कसे जगायला हवे. या पिढीकडून शिकूयात आणि आपल्या पुढच्या पिढीसाठी जीवनाचे धडे जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करू या.



शुभम सत्यभामा रामकृष्ण गायकवाड
८३८००२९३०२
shubhamgaykwad321@gmail.com
समाजवार्ता

*(लेखक सीएसआरडी समाजसेवा महाविद्यालयातील विद्यार्थी आहेत)*

# व्यंगचित्रकारांत माणसाला ओळखण्याची जादू- मंजुळे

पुणे । प्रतिनिधी

कला आणि कलाकार यांनी नेहमीच अहमदनगर जिल्ह्याचे नाव महाराष्ट्रात कमविले आहे यंदाही हि बाब गौरवाची आणि आपल्या जिल्ह्याला अभिमान वाटेल अशीच आहे कारण राज्यस्तरीय विवेक रेषा व्यंगचित्र प्रदर्शन कार्यक्रमात महाराष्ट्रातील शेकडो व्यंगचित्रकारातून फक्त २५ नावे निवडण्यात आली आणि या यादीत अहमदनगर जिल्हयातील संगमनेरचे प्रसिद्ध व्यंगचित्रकार अरविंद गाडेकर व आनंद गायकवाड यांची निवड झाली पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून विवेकरेषा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी त्यांना सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक ''सैराट'' फेम नागराज मंजुळे यांच्या भाषणाने झाली.



यावेळी बोलतांना ते म्हणाले व्यंगचित्रकारांमध्ये अनेक गुण असतात आणि त्या गुणातुन व विवेकबुद्धीतुन रोज नवनविन व्यंगचित्र काढून जनतेला हसवत असतात परंतु त्यापाठीमागे खुप मोठा संदेश सुध्दा देतात. व आपणही आपले व्यंग,व्यंगचित्रकारा कडून काढायला हवे कारण व्यंगचित्रकारांमध्ये माणसाला ओळखण्याची जादू असते असे उद्गार प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक ''सैराट'' फ ेम नागराज मंजुळे यांनी काढले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आंतरराष्ट्रीय ख्यातीचे व्यंगचित्रकार मंजूल हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध पटकथा लेखक व नाटककार अरविंद जगताप यांनी आपल्या भाषणात पंडित नेहरू व आर. के. लक्ष्मण पासून ते इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्या बाबतीत व्यंगचित्रकारांबद्दल अनेक उदाहरणे सांगून श्रोत्यांना खळखळून हसविले. अध्यक्षीय भाषणात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे व्यंगचित्रकार मंजुल यांनी व्यंगचित्रकार व त्यांच्या समस्यांवर भाषण दिले. मुक्ता दाभोळकर यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले. मार्मिकचे गौरव सर्जेराव, हमिद दाभोळकर, तसेच संगमनेर साहित्य परिषदेचे रमेश काका सराफ, सुभाष कु-हे, बालकृष्ण महाजन, सय्यद असिफ अली, दिलिप उदमले,शेख ईदरीस, हेरंब महाजन, तसेच मोठ्या प्रमाणात श्रोते उपस्थित होते.



# २० वर्षाखालील फुटबॉल संघ जाहीर

## आंतरजिल्हा फुटबॉल स्पर्धेसाठी लोणावळा येथे रवाना

अहमदनगर । प्रतिनिधी

जिल्ह्याचा २० वर्षाखालील फुटबॉल संघ जाहीर करण्यात आला आहे. संघाची निवड भुईकोट किल्ल्याच्या मैदानावर नुकतेच पार पडलेल्या निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिरातून झाली आहे. या निवड चाचणीत ५० हून अधिक खेळाडूंचा सहभाग लाभला होता. निवड चाचणीत उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या खेळाडूंची जिल्ह्याच्या संघात निवड करण्यात आली आहे. जिल्ह्याच्या २० वर्षाखालील फ ुटबॉल संघात कर्णधार- रुषभ गोपाळ मणी, अभिवाचन सोनाजी थोंबे, आदित्य राजेश तळेकर, अक्षय नान्दू कोटकर, अम्मार शेख, अर्मान शेख, यश गोकुळ कोतकर, जिनेश संतोष छल्लाणी, जॉय पंकज शेलळे, मंथन मनोज कदम, ओम राहुल म्हस्के, पियुष विष्णू भोसले, रोहित प्रमोद पवार, साहिल राजू उर्मुडे, साहिल संतोष कुसळकर, स्वराज राजाभाऊ वाघमारे, उत्कर्ष मनीष सोनवणे, वेदांत नितीन दिकोंडा या खेळाडूंचा समावेश आहे. लोणावळा (जि. पुणे) येथे होणाऱ्या २० वर्षाखालील आंतर जिल्हा फुटबॉल स्पर्धा होणार असून, अहिल्यानगर जिल्ह्याचा पहिला सामना ११ एप्रिल रोजी रत्नागिरी जिल्ह्याविरुद्ध होणार आहे. या स्पर्धेसाठी संघाचे खेळाडू रवाना झाले आहेत. संघाचे मार्गदर्शक प्रशिक्षक म्हणून विक्टर जोसेफ काम पाहत असून, त्यांना अभिषेक सोनवणे सहाय्यक प्रशिक्षक म्हणून साथ देत आहेत. या निवड चाचणीसह खेळाडूंना प्रशिक्षण व स्पर्धेला पाठविण्यासाठी संपूर्ण नियोजनात अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे मानद सचिव रोनाप फर्नांडिस यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. खेळाडूंच्या निवडीपासून ते त्यांच्या नोंदणी व संघ बांधणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर त्यांचे मोलाचे योगदान लाभले. असोसिएशनचे कार्यकारी सदस्य रिषपालसिंग परमार, जोगासिंग मिन्हास व प्रदीप जाधव यांनीही संघाच्या व्यवस्थापनासाठी मोलाचे सहकार्य केले. खालिद सय्यद आणि राजू पाटोळे यांनी मैदानावर राहून संघाला मार्गदर्शन केले. असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांनी संघाला शुभेच्छा देऊन जिल्ह्यातील युवा खेळाडूंकडून मोठी अपेक्षा व्यक्त केली.

# मोफत भाषणकला प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

अहमदनगर । प्रतिनिधी

बालाजी फाउंडेशन अहमदनगगर यांचेकडून भाषणकला प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली आहेकरण्यात आली आहे.

शनिवार ता.१२ एप्रिल रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत सावेडी येथील रावसाहेब पटवर्धन स्मारक येथे या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यात वक्तृत्व, सूत्रसंचालन, निवेदन, आवाजाच्या क्षेत्रातील संधी यावर मार्गदर्शन करण्यात येईल असे फाउंडेशनचे अध्यक्ष अमित आव्हाड यांनी सांगितले. अहिल्यानगर जिल्ह्यातील सुप्रसिद्ध निवेदक, व्हाईस ओव्हर आर्टिस्ट उद्धव काळापहाड (), डबिंग आर्टिस्ट प्रा. विजय साबळे, अभिनेते, निवेदक प्रा. प्रसाद बेडेकर हे यात मार्गदर्शन करणार असल्याची माहिती आव्हाड यांनी दिली. कार्यशाळेत स्टेज डेअरिंग, आदर्श वक्त्याचे गुण, आवाजाचे व्यायाम, वक्तृत्वाला




झळाळी देण्यासाठीच्या टिप्स, तसेच करिअरच्या संधी यावर मार्गदर्शन करण्यात येईल. इच्छुकांनी ९३०९५३०३६३ या मोबाईल नंबरवर नावनोंदणी करावी असे आवाहन बालाजी फाउंडेशन चे उपाध्यक्ष किरण वाकचौरे यांनी केले. कार्यशाळा यशस्वी व्हावी यासाठी सागर मेहेत्रे, जालिंदर शिंदे, ज्ञानेश्वर आव्हाड, जावेद सय्यद, शिवानी शिंगवी, भगवान राऊत, चेतन गायकवाड आणि बालाजी फाउंडेशनचे सदस्य परिश्रम घेत आहेत.

# हिवताप निर्मूलन कर्मचारी संघटनेचे आक्रोश आंदोलन

## मागण्या मान्य न झाल्यास तीव्र स्वरूपाचा आंदोलन- इशारा

अहमदनगर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य हिवताप निर्मूलन कर्मचारी संघटना (र.नं.२९३४/८४) आर. एन.सोनार राज्याध्यक्ष आणि डी.एस.पवार, राज्य सरचिटणीस यांचे नेतृत्वाखाली ९ एप्रिल रोजी जिल्हाधिकारीकार्यालयासमोर लक्षवेधी आक्रोश निदर्शने आंदोलन करण्यात आले.




यामध्ये राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रम आणि त्या अंतर्गत असलेले प्रशासकीय कामकाजाचे नियंत्रण जिल्हा परिषद यंत्रणेकडे सोपवण्याचे २२ नोव्हेंबर २०१९ चे शासन परिपत्रकावरील ६ वर्षापूर्वी स्थगित झालेली कार्यवाही पुन्हा सुरू करण्याचे निर्णय तात्काळ थांबविण्यात यावे, बायोमेट्रिक फेस रीडिंग चे अंमलबजावणीस अडचणी येत असल्याने आणि शासनाने तशी सुविधा उपलब्ध करून दिली नसल्याने त्यावरील कार्यवाही त्वरित स्थगित करण्यात यावी या मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महाराष्ट्र राज्य हिवताप निर्मूलन कर्मचारी संघटनेच्या वतीने लक्षवेधी आक्रोश निदर्शने आंदोलन करण्यात आले.

या मागण्या लवकरच मान्य न झाल्यास तीव्र स्वरूपाचा आंदोलनाचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. यावेळी संघटनेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी यांचे मार्फत हिवताप विभागाचे जिल्हा परिषदेकडे होणारे हस्तांतरण त्वरीत थांबविण्यात यावे याबाबत निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हा हिवताप कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष किसन भिंगारदिवे, सरचिटणीस पुरुषोत्तम आडेप, कैलास ढगे, प्रसाद टकले, अरुण लांडे, गणेश महाजन, संजय नरवडे, सुनील मुंगसे, नितीन नेवासकर, सागर गायकवाड,अर्जुन वाघमोडे, तसेच महिला प्रतिनिधी शोभा अहिरवाडी, अश्विनी गायकवाड, राज्य सरकारी मध्यवर्ती संघटनेचे सुभाष तळेकर, रावसाहेब निमसे, भाऊसाहेब डमाळे, अशोक मासाळ यांसह संघटनेचे पदाधिकारी, जिल्ह्यातील कर्मचारी, महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विखे पाटील अभियांत्रिकीचे प्रा. मगर यांना पीएचडी

अहमदनगर । विजय मते



विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. सुशील मगर यांना नुकतीच मंडसूर विद्यापीठचे ''एक्सपेरीमेंटल इन्व्हेस्टिशन टु ऑप्टीमाईज कव्हरेजर रेशो इन कोनीकल हिट एक्सचेंजर'' या विषयावर यंत्र अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यावाचस्पती (पीएचडी) पदवी प्रदान करण्यात आली.

सदर अभ्यासकमात त्यांना वाराणसी येथील आयआयटीचे डॉ. गौरव गुगलीयानी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावरील मेकॅनिकल व ऑटोमोबाईल या विषयाचे अभ्यासमंडळाचे सदस्य डॉ. रविद्र नवथर यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. सुशील मगर यांच्या या विषयावरील रिसर्चचा अभ्यास करत असताना त्यांनी इंटरनॅशनल, स्कोपस जर्नल्समध्ये ०३ पेपर प्रसिध्द केले. तसेच नॅशनल व इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये त्यांचे वरील विषयावरील एकुण ०३ पेपर्सचे पब्लीकेशन झालेले आहे. डॉ.सुशील मगर यांचे सर्वत्र अभिनंदन होत असुन त्यांच्या या सुयशाबद्दल संचालक तंत्र प्रा. सुनिल कल्हापुरे, प्राचार्य डॉ.उदय नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. या सुयशाबद्दल संस्थेचे चेअरमन व जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा.डॉ.सुजय विखे प्रभारी सेक्रेटरी जनरल डॉ. पी.एम. गायकवाड यांनी त्यांचे कौतुक केले.




रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.


मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# भगवान महावीर स्वामी जयंती उत्साहात साजरी

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

जगाला शांतीचा संदेश देणारे जैन धर्माचे २४ वे तीर्थकार भगवान महावीर स्वामी यांची जन्मकल्याणक (जयंती) सकल जैन संघाद्वारे भगवान महावीर स्वामी यांच्या प्रतिमेची श्रीगोंदा शहरातुन भव्यदिव्य अशी शोभायात्रा काढुन आनंदी व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

भगवान महावीर स्वामी यांचा जन्म इ.स. पूर्व ५९९ मध्ये याच तिथीला कुंडलपूर नामक शहरात झाला. भगवान महावीरांनी त्यांच्या जीवनात व त्यांच्या आचरणातून जे काही सांगितले आहे. त्याच पदचिन्हावर मार्गक्रमण करीत जैन समाज मार्गक्रमण करीत आहे. भगवान महावीरांचे चरित्र अहिंसा, सत्य,अपरिग्रह ब्रह्मचर्य व तप या सिद्धांतावर आधारित आहे. श्रीगोंदा सकल जैन संघात भगवान



महावीर स्वामी जन्मकल्याणक दिनानिमित्त खूपच आनंदाचे वातावरण पाहण्यास मिळाले. यावर्षी प्रथमच श्रीगोंदा शहरात संपूर्ण तालुक्यातुन छोट्या मोठ्या गावातील जैन बांधव एकत्रित येऊन एकाच ठिकाणी भगवान महावीरांचा जन्म कल्याण दिन साजरा करण्यात आला. तालुक्यातील जैन बांधवांनी भरभरून प्रतिसाद दिला व श्रीगोंदा तालुक्यातील सर्व गावातील जैन बांधव श्रीगोंद्यात जमा होऊन सकाळी ७ वा. जैन स्थानक श्रीगोंदा या ठिकाणाहून भगवान महावीर स्वामींच्या प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात आली. ही शोभायात्रा शिवाजी चौक, शनी चौक, जोधपुर मारुती चौकातुन जात बालाजी मंगल कार्यालयात संपन्न करण्यात आली. शोभायात्रेत सर्व जैन बांधवांनी सफेद वस्त्र परिधान केले होते व जैन भगिनींनी सौभाग्याचं प्रतीक असणारे लाल वस्त्र परिधान केले होते. त्यामुळे शोभायात्रेस खूपच सुंदर असे स्वरूप प्राप्त झाले होते. शोभा यात्रा मार्गक्रमण करीत असताना सर्व जैन बांधवांनी मार्गात कुठल्याही प्रकारचा कचरा अस्ताव्यस्त न टाकता त्या कचऱ्याची योग्य निर्मूलन करून खूपच सुंदर असा स्वच्छतेचा मूलमंत्र शहरवासीयांना दिला. या उपक्रमाची चर्चा संपूर्ण शहरात दिवसभर चालु होती. शोभायात्रा बालाजी मंगल कार्यालयात पोहोचल्यानंतर महावीर स्वामीच्या जीवनावरती प्रकाश टाकण्याकरता सटाण्याहून आनंद बंब यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी सर्व जैन बांधवांना महावीर स्वामींच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगत मार्गदर्शन केले. याच काळात दुसरीकडे रक्तदान शिबिर घेण्यात आले तसेच शहरातील आनंद सद्भावना सेवा मंडळांच्या वतीने शहरालगत असणाऱ्या वनविभागाच्या जंगलामध्ये वास्तव्य करणाऱ्या वन्यजीवांसाठी पिण्यासाठी असलेल्या अनेक पाणवठ्यात टँकरदवारे पाणी सोडुन वन्यप्राण्यांच्या पाण्याची व्यवस्था केली.

याप्रसंगी शहरातील सर्व समाजातील प्रतिष्ठित मान्यवरांसह मा.मंत्री आ. बबनदादा पाचपुते, अनुराधा नागवडे, मा. आमदार राहुल जगताप, टिळक भोस, स्मितल भैया वाबळे, शुभांगी ताई पोटे, एम डी शिंदे, अशोक खेंडके, बाप्पू गोरे, संतोष शिरसागर, गणेश भोस, सतीश बोरुडे, पत्रकार बंधू व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्याख्यान झाल्यानंतर सर्व उपस्थित मान्यवर नागरिक व जैन बांधवांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला. सदर महाप्रसादाची व्यवस्था करण्याचा लाभ लौकीक दिलीप मेहता व वैभव दिलीप मेहता यांनी घेतला होता. कार्यक्रमाची प्रस्ताविक व सुत्रसंचलन विजय मुथा यांनी केले. यावेळी सकल जैन संघाचे अध्यक्ष विजय बोरा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. उपस्थितांचे आभार नवनीत मुनोत यांनी मानले.

## कोपरगाव ग्रामीणाला दोन विद्युत उपकेंद्राने जोडले जाणार– कोल्हे

### पाठपुराव्याच्या यशाने नागरिकांना आनंद

**कोपरगाव । किसन पवार**

तालुक्यातील पोहेगाव, रांजणगाव देशमुख या दोन विद्युत उपकेंद्राचा प्रशासकीय कारभार राहता इथून चालविला जात आहे. अनेकदा विजेच्या समस्या निर्माण झाल्यास नागरिकांना वेळेवर प्रश्न सुटण्यास अडचणी येत होत्या. महावितरण कार्यालयाने यावर कार्यवाही करावी यासाठी कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी अनेकदा कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांच्याकडे आपल्या व्यथा मांडल्या होत्या.



त्यानुसार कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही समस्या मांडली होती.नुकतेच वरिष्ठ स्तरावर आदेश झाले असून लवकरच कोपरगाव ग्रामीणला हे दोन विद्युत उपकेंद्र जोडले जाणार असल्याने कोल्हे यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे याबद्दल नागरिकांनी आनंद व्यक्त केला. समस्या निवारण बैठकीतून विवेक कोल्हे यांना वीजेच्या समस्या बद्दल पोहेगाव, रांजणगाव देशमुख आणि चांदेकसारे परिसरातील नागरिकांनी अनेकदा या प्रश्नावर तक्रारी केल्या होत्या. दोनही सबस्टेशन कोपरगाव तालुक्यात जोडले गेले तर समस्या निर्माण झाल्यास त्या सोडवण्यासाठी आम्हाला सोयीस्कर ठरेल अशी या नागरिकांनी अपेक्षा व्यक्त केली होती. तात्काळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबद्दल पत्रव्यवहार करून कोल्हे यांनी हा प्रश्न सोडवण्यासाठी लक्ष घालण्याची विनंती केली असता मुख्यमंत्री कार्यालयाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना आदेश दिले असून लवकरच याबद्दल कार्यवाही सुरू होणार आहे. अनेकदा वीज प्रवाह खंडित झाला अथवा ट्रान्सफॉर्मर बंद पडल्यास नागरिकांना थेट राहता येथे संपर्क करावा लागत होता. दळणवळणाच्या दृष्टीने राहाता या परीसरातील नागरिकांसाठी सोयीचे नव्हते. या समस्येला सोडवण्यासाठी विवेक कोल्हे यांनी प्रयत्न केल्याने लवकरच हा प्रश्न निकाली निघणार आहे. विजेच्या वारंवार होणाऱ्या लपंडावामुळे त्रस्त नागरिकांना या निर्णयाने दिलासा मिळणार असून वीस ते पंचवीस गावातील विद्युत क्षेत्रातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

## ट्रकच्या चाकाखाली सापडून युवक ठार



**पाथर्डी । नितीन गटाणी**

शहरात गुरुवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर ट्रकच्या मागच्या चाकाखाली सापडून विकास परमेश्वर सोनवणे, (वय-२० रा. निपाणी जळगाव, तालुका पाथर्डी) याचा जागीच मृत्यु झाला. रस्त्याच्या कडेला अस्ताव्यस्त उभ्या केलेल्या गाड्यांमुळे हा अपघात झाल्याचे प्रत्यक्ष दर्शनी लोकांनी सांगितले. दोन गाड्यांच्या मधून जात असताना मोटारसायकलस्वार विकासचा तोल गेला आणि रस्त्यावर खाली पडल्यानंतर डोक्यावरुन चाक गेल्याने क्षणार्धात त्याचा मृत्यु झाला. निपाणी जळगाव येथील रहिवाशी विकास सोनवणे हा युवक पाथर्डी शहरातील अभ्यासिकेत पोलिस भरतीच्या परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी येत होता. विकासची आई काहीतरी सामान घेण्यासाठी दुकानात गेली होती. तेवढ्यात विकास गाडीवरुन जात होता. रस्त्याच्या कडेला विको कंपनीची गाडी रस्त्यावर उभी केलेली होती. त्याचवेळी समोरुन बारा चाकाचा ट्रक जात होता. रस्त्यालगत उभी केलेली विको गाडी व ट्रक यांच्यात विकासची मोटारसायकल अडकली आणि तोल गेल्याने तो खाली पडला व त्यांच्या डोक्यावरुन ट्रकचे मागचे चाक गेले. विकास मोठ्याने ओरडला मात्र क्षणार्धात फट्ट असा आवाज झाला आणि त्याचा आवाज कायमचा बंद झाला.

**विकास सोनवणे मोटारसायकल चालवत असताना भ्रमण दूरध्वनीवर बोलत असल्याचे अपघात पाहणाऱ्यांनी सांगितले. गाडी चालवताना फोनवर बोलू नये एवढा साधा नियम आजचे युवक पाळणार नसतील तर मग अशा अपघाताच्या घटना रोज घडतील. तो फोनच विकासचा काळ ठरला. विकासाची आई ओक्साबोक्शी रडत होती. हृदय पिळवटुन टाकणारी ही घटना मनाला वेदना देणारी असली तरी इतर युवकांच्या डोळ्यात अंजन घालणारीही आहे.**

**शहरात रस्त्यावर उभ्या केलेल्या दुचाकी व चारचाकी गाड्या वाहतुकीस अडथळा ठरत आहेत. याबाबत पोलिसांना वेळोवेळी माहीती देऊनही पोलिस कारवाई करीत नाहीत. कारवाई केली तर राजकीय हस्तक्षेप ठरलेलाच. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर रस्त्यावर चारचाकी गाड्या, माल वाहतूक करणारे टेम्पो व दुचाकी उभ्या केलेल्या असतात. आम्ही पोलिसांना हप्ते देतो. त्यामुळे पोलीस आमचं काही करणार नाहीत अशी मुजोरी येथील काही वाहन चालक करीत आहेत. अपघाताला कारण ठरलेल्या ट्रक चालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी निपाणी जळगावच्या ग्रामस्थांनी पोलिसाकडे केली आहे.**



## भगवान महावीर जयंती उत्साहात साजरी

**नेवासा । विजय खंडागळे**

जैन महासंघाच्या वतीने या वर्षीची महावीर जयंती शिराळ चिचोंडी येथील आनंद तीर्थ येथे साजरी करण्यात आली. यावेळी नेवासा आणि पाथर्डी तालुक्यातील जैन समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

याप्रसंगी आचार्य आनंदऋषी महाराज साहब यांच्या सुशिष्या परम पूज्य सुनंदाजी महाराज व पूज्य ओजस् दर्शनजी महाराज साहब त्यांच्या शिष्या सह उपस्थित होते. शुभदाजी , ओजस्जी व सुनंदाजी महाराज साहब यांचे भगवान महावीर स्वामी च्या जीवन चरित्र व त्यांनी दिलेला अहिंसा,मानवता, जगा आणि जगू द्या या शिकवणूक यावर विस्तारित प्रवचन व भजन झाले. आनंदतीर्थ या आनंदऋषी महाराज साहब यांच्या जन्मस्थळी आजचा कार्यक्रम अतिशय सुंदर व नियोजनबद्ध स्वरूपात करण्यात आला.

चिचोंडी गावातील जैन स्थानका पासून आनंदतीर्थ पर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. सोनई व नेवासा येथील महिलांचे भक्तिगीत झाले. विविध वक्त्यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मनोज चंगेडिया यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व समाज बांधवांनी योगदान दिले. कार्यक्रम नंतर गौतम प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



## विवेक कोल्हे यांचे खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहन- पराग संधान

### खेळाडूंना तलवारबाजीचे साहित्य भेट

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगांव येथे खेळाडूंना अधिक प्रोत्साहन मिळावे, आधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने युवानेते विवेक कोल्हे यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. त्यांनी अहमदनगर जिल्हा फेन्सिंग असोसिएशनचे समर्थ स्पोर्ट्स अकॅडमी यांना तलवारबाजीचे इलेक्ट्रॉनिक स्कोअर बोर्ड तसेच विविध खेळांसाठी आवश्यक साहित्य भेट स्वरूपात दिले. या साहित्याचे उद्घाटन अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान, ॲड.जयंत जोशी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या प्रसंगी अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यावेळी बोलताना पराग संधान म्हणाले की खेळाला राजाश्रय मिळाला, तर ग्रामीण भागातील सुप्त प्रतिभेला योग्य दिशा व व्यासपीठ मिळू शकते. यावर भर देत विवेक कोल्हे हे सातत्याने विविध माध्यमातून खेळाडूंना प्रोत्साहन देत आले आहेत. आर्थिक सहाय्य, आवश्यक साहित्य, मार्गदर्शन, तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन या माध्यमातून ते युवा पिढीला सकारात्मक ऊर्जा देत आहेत. कोपरगाव मतदारसंघातील खेळाडूंनी केवळ जिल्हा नव्हे तर राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवावे, ही त्यांची दूरदृष्टीपूर्ण भूमिका आहे. उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ क्रीडा प्रशिक्षक दिलीप घोडके, वानखेडे, चंद्रशेखर शेजुळ, राजू शेंडगे, रियाज, कोताडे, योगगुरू अभिजित शहा, शिवप्रसाद घोडके तसेच प्रशिक्षक व सर्व खेळाडू उपस्थित होते. या कार्यक्रमात खेळाडूंनी दिलेल्या साहित्याबद्दल समाधान व्यक्त केले आणि अशा आधुनिक सुविधांमुळे सरावाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. या उपक्रमामुळे कोपरगांवमधील क्रीडा संस्कृतीला बळकटी मिळेल, असे प्रतिपादन उपस्थित मान्यवरांनी केले. विवेक कोल्हे यांच्या या प्रयत्नामुळे खेळाडूंमध्ये नवी उमेद निर्माण झाली असून, हे योगदान निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. त्यांच्या अशा सकारात्मक सहभागामुळे कोपरगाव तालुक्याचा क्रीडा नकाशावर ठसा उमटवण्याचा मार्ग सुकर झाला आहे अशा भावना पराग संधान यांनी यावेळी बोलताना व्यक्त केल्या.

## राज्य महिला आयोगाचे धर्मादाय रुग्णालयांबाबत महत्त्वाचे निर्देश

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळं गर्भवती महिला तनिषा भिसे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणामुळं राज्यात संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान, राज्य महिला आयोगाने धर्मादाय रुग्णालयांबाबत महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. धर्मादाय रुग्णालयांनी यापुढे धर्मादाय असा उल्लेख असलेला फलक दर्शनी भागात लावावा, त्यानुसार असलेल्या सुविधा, नियमावली यांची माहितीही लावावी यासाठी तातडीने कार्यवाही करावी असे निर्देश राज्य महिला आयोगाने आयुक्त, धर्मादाय यांच्या कार्यालयाला दिले. राज्यात १०० पेक्षा अधिक धर्मादाय रूग्णालय असून श्रीरामपूर येथे साखर कामगार रुग्णालयासह इतरही आहेत. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने धर्मादाय रुग्णालय असूनही तनिषा भिसे यांना त्या माध्यमातून मदत न केल्याचे चौकशी अहवालात ही समोर आले आहे. या अनुषंगाने अनेक रुग्णालये धर्मादाय असूनही त्याची माहिती देत नाहीत, त्यामुळे सामान्य नागरिकांना मदत मिळत नाही हे निदर्शनास आले आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकालाही चांगले उपचार मिळावे यासाठी असलेला धर्मादाय रुग्णालयाचा हेतूच साध्य होत नाही. तेव्हा सर्व धर्मादाय रुग्णालयांनी यापुढे धर्मादाय असा उल्लेख असलेला फलक दर्शनी भागात लावावा, त्यानुसार असलेल्या सुविधा, नियमावली यांची माहितीही लावावी यासाठी तातडीने कार्यवाही करावी असे निर्देश राज्य महिला आयोगाने आयुक्त, धर्मादाय यांच्या कार्यालयाला दिले होते. धर्मादाय सहआयुक्त यांच्या विधी व न्याय विभागाने असे फलक लावण्यात आले असल्याचे आणि अपवादात्मक परिस्थितीमध्ये काही रुग्णालयाकडून फलकप्रसिद्धी करणेबाबत पूर्तता राहिली असल्यास त्याबाबत कारवाई करून त्रुटी दूर करणेसाठी निर्देशित केले असल्याचे कळवले आहे. यापुढे सामान्य नागरिकांना असे धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी असलेल्या पण तसा उल्लेख केलेला नाही,फलक लावला नाही असे आढळल्यास तसेच नियमावली प्रमाणे मदत न मिळाल्यास ते राज्य महिला आयोगाला,शासनाला त्वरित तक्रार करू शकतात.

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पोलीस ठाण्यासमोर आमरण उपोषण

## थोडा वेळ द्या कारवाई करू- समाधान नागरे

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

तालुक्यातील सुरू असलेले अवैध धंदे हे ताबडतोब बंद करावे. तसेच शहरांमध्ये होत असलेल्या चोऱ्यांचे तपास तात्काळ करावे या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आज बुधवार ता. ०९ रोजी आमरण उपोषण करण्यात आले. शहरांमध्ये तसेच तालुक्यामध्ये अवैध धंद्याने सूळसुळाट केला आहे. तसेच शहरामध्ये भुरट्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. तसेच या चोऱ्यांचा तपास पोलिसांकडून होत नाही. त्याचबरोबर चोरी झाल्यानंतर संबंधित पोलीस स्टेशनला आल्यानंतर त्यांची तक्रार घेतली जात नाही. त्यांना पोलिसांकडून अरेरावी ची भाषा केली जाते.



**शेवगाव शहरामध्ये रामनवमीची मिरवणूक असल्याकारणाने आजचे आंदोलन हे पोलीस निरीक्षकांच्या शब्दावर मागे घेतात. येत्या आठ दिवसांत चोऱ्यांचा तपास लागला नाही व अवैध बंद झाले नाही तर आठ दिवसानंतर कोणत्याही क्षणी शेवगाव पोलीस स्टेशन समोर आमरण उपोषण केले जाईल.**

**रावसाहेब लवांडे,**
जिल्हाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना, अहिल्यानगर

त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई व्हावी तसेच चोरीच्या घटनांमधील जे आरोपी आहेत. त्यांना तात्काळ अटक करावी या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आज सकाळी शेवगाव पोलीस ठाण्यासमोर आमरण उपोषण केले. यावेळी शेवगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान नागरे यांनी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांशी चर्चा केली व येथे आठ दिवसांमध्ये कारवाई करू अशी आश्वासन दिले. तसेच शेवगाव शहरांमध्ये रामनवमीची मिरवणूक असल्या कारणाने पोलीस यंत्रणेला सहकार्य करावे असे नागरे यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितल्यानंतर पदाधिकारी यांनीही पोलिसांना सहकार्य करण्याचे ठरवले.


यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे किसान सेलचे जिल्हाध्यक्ष शरद शिंदे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जेष्ठ कार्यकर्ते मच्छिंद्र आर्ले, जिल्हा उपाध्यक्ष दत्ता फुंदे, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे, बाळासाहेब शिंदे, शेवगाव तालुका अध्यक्ष प्रवीण भराट, तालुका उपाध्यक्ष मेजर अशोक भोसले, शहर अध्यक्ष अमोल देवढे, दादासाहेब पाचरणे, माऊली धनवडे, शेषराव आपशेटे, नानासाहेब कातकडे, अंबादास भागवत, हरिभाऊ कबाड्डी, सलिम पठाण, सुरेश गरड, सुनील देसरडा इत्यादी पदाधिकारी यावेळी हजर होते.

## सावित्रीमाई महात्मा फुले विनम्र अभिवादन



# क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले

भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांची जयंती. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे.



प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.

सर्वसाक्षी जगतपती।<br>
त्याला नकोच मध्यस्ती।।

हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरुवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

विद्येविना मती गेली ।<br>
मतिविना नीती गेली।<br>
नितीविना गती गेली ।<br>
गतिविना वित्त गेले ।<br>
वित्ताविना शूद्र खचले ।<br>
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतः च्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप विरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र्य पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!


श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

(पान १ वरुन)

# महात्मा फुलेंचा शोध निर्मिकाचा

मानव स्त्री-पुरुषांस आपापले प्रपंच आवरून जर का हा ग्रंथ त्यांस वाचता येईल तर एकंदर सर्व रिकामटेकडे धूर्त त्यांस लुटून खातील यास्तव एकंदर सर्व मानव स्त्रि-पुरुषांच्या उपयोगी हा ग्रंथ पडावा म्हणून या ग्रंथास सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक असे नाव दिले आहे.

एकंदरीत सार्वजनिक सत्य धर्म पुस्तकामध्ये सुख, धर्म पुस्तक, निर्माणकर्ता, पूजा, नामस्मरण, नैवद्य अथवा अन्नदान, अनुष्ठान, स्वर्ग/स्त्री-पुरुष, पाप पुण्य, जातिभेद, धर्म, नीती, तर्क, दैव, सत्य, आकाशातील ग्रह, जन्म, लग्न, दुष्टाचरण, मृत्यू, प्रेताची गती, श्राद्ध, वेद आणि सार्वजनिक सत्याची तुलना आणि एकंदर सर्व स्त्रीपुरुषांस ग्रंथकर्त्याची प्रार्थना बाबत याबाबतचे सत्य मांडण्यात आले आहे. महात्मा फुले यांनी त्यांच्या खास शैलीने प्रश्न आणि उत्तर या स्वरूपात हे पुस्तक लिहिलेले आहे. याचा आढावा घेतल्यास आपणास या पुस्तकाचे गांभीर्य समजून येईल. महात्मा फुले यांची निर्मिक संकल्पना विश्वव्यापी आहे, त्यांच्यामध्ये या विश्वातील प्रत्येक सजीवाचा निर्माता एकच आहे. निर्मिक कोणत्याही विशिष्ट जातीधर्माचा नाही. गटाचा नाही, उच्च- नीच? हलका- भारी, स्त्री- पुरुष असा भेद मानणारा नाही. हा, ना हिंदूंचा, ना मुसलमानांचा, ना ख्रिश्चनांचा, तो सर्वांचाच आहे. त्याची दृष्टी सर्वांकडे सारखीच असते. त्याला जर शोधायचे असेल तर ना देवळात, ना मस्जिदमध्ये, ना चर्चमध्ये. त्या निर्मिकाला शोधायचा असेल तर त्याला माणसात शोधा, माणसाची सेवा करा.

महात्मा फुले म्हणतात, या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवाने धर्मपुस्तके केली आहे त्यापैकी एकही ग्रंथात आरंभापासून शेवटपर्यंत एकसारखे सार्वजनिक सत्य नाही. कारण प्रत्येक धर्म पुस्तकांमध्ये काही एक व्यक्तींनी त्या वेळच्या प्रसंगास अनुसरून हेकडपणा केल्यामुळे ते धर्म एकंदर सर्व मानवी प्राण्यास सारखे हितकारक न होता सहजच त्यामध्ये अनेक फळ्या होऊन त्या एकमेकांचा मनापासून हेवा व द्वेष करू लागतात. दुसरे असे की, निर्माणकर्ता जर आपण सर्व मानवांचा निर्मित आहे तर एकंदर सर्व मानवी प्राण्यांपैकी प्रत्येक व्यक्तीस त्याने कृपाळू होऊन एकंदर सर्व उत्पन्न केलेल्या मानवी अधिकारांचा यथायोग उपभोग घेता यावा, असे घडून येत नसल्यामुळे त्यास अनेक प्रकारच्या दुःखासह अडचणी सोसाव्या लागतात.

नुकताच कुंभमेळ्यासंदर्भात दोन्ही बाजूच्या प्रतिक्रिया आपण वाचत असतो. पर्यावरणवादी आणि बुद्धिवादी लोकांनी कुंभमेळ्यामध्ये स्नान करणे ही अंधश्रद्धा आहे तसेच गंगेच्या नदीत अंघोळ केल्याने पाप धुतले जाते हा लोकांचा गैरसमज आहे, असे म्हटले आहे. किंबहुना गंगेमध्ये धार्मिक सामग्री टाकली जाते, अंघोळी केल्या जातात, साबण आदी गोष्टींमुळे पाणी आणखी खराब झाले आहे. गंगा नदी स्वच्छ करण्याच्या योजनेत कोट्यावधी रुपये खर्च करूनही ती स्वच्छ झालेली नाही. याबाबत महात्मा फुले यांनी आपल्या सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, आपल्या या सूर्य मंडळासह आपण वस्ती करणाऱ्या पृथ्वीचा निर्माणकर्ता जर एक आहे तर तीच वरील अनेक देशातील लोकांचा एकमेकांशी वैरभाव मागून प्रत्येकामध्ये देशाभिमान व धर्माभिमानाचे खूळ व्यर्थ का माजले आहे. त्याचप्रमाणे या पृथ्वीवरील अनेक देशातील सर्व नद्या महासागरास मिळत असता त्यापैकी एका देशातील नदी पवित्र कशी होऊ शकेल, कारण ती महापवित्र नदी श्वानाचे मलमूत्र पोटात घेऊन समुद्रास वाहून नेण्यास कधी मागे पुढे घेत नाही.नुकतेच व्हाट्सअपवर व सोशल मीडियावर सुनीता विल्यम यांच्याबाबत अनेक अंधश्रद्धा पसरवणाऱ्या बातम्या येत होत्या की, सुनीता विल्यम्स अंतराळातून येताना गंगाजल घेऊन आले आहेत. तसेच त्या अंतराळात हिंदू संस्कृतीचे प्रतीक म्हणून गणपतीची मूर्ती घेऊन गेल्या होत्या. सोबत भगवद्गीता देखील घेऊन गेल्या होत्या. त्यामुळेच त्यांचा प्रवास यशस्वी झाला. याबाबत महात्मा फुले यांनी अगोदरच सांगून ठेवले आहे की, पूर्व अथवा पश्चिम अथवा दक्षिण अथवा उत्तर इत्यादी दहा दिशांपैकी एकातरी दिशेचा आपण शोध करू लागल्यास तीचा अंत लागेल काय ? सर्व दिशांच्या पोकळीची लांबी रुंदी उंची खोली याचा थांगपत्ता लागणार नाही. ती अनंत आहे. आपल्या पृथ्वीवरील प्राणीमात्रांसह पशु, पक्षी, वृक्ष इत्यादीकांस ज्याने निर्माण केले आहे, तो काय करतो ? कोठे व तो कसा आहे ? हे पाहण्याची आपण मानव प्राण्यांनी इच्छा करू नये. कारण आम्हा प्राण्यांचे आयुष्य ते किती आहे? याकरिता निर्माणकर्ता कोण ? या फांद्यात न पडता मानवाने सत्याच्या मार्गाने आपले जीवन सार्थकी लावावे.आपल्या निर्माणकर्त्यावर फुले चढवून त्याची पूजा कोणत्या तऱ्हेने करावी ? फुले म्हणतात की, पृथ्वीवरील पुष्प वगैरे सर्व सुवासिक पदार्थ जर निर्माणकर्त्यांनी दया दृष्टीने आपल्या मानवाच्या उपभोगासाठी उत्पन्न केली आहेत तर त्यापैकी कोणता पदार्थ उलटा आपण निर्मिकावर वाहून त्याची पूजा करावी ? एकंदर सर्व पदार्थ निर्मिकाने जर उत्पन्न केलेली आहेत, तर आपल्याजवळ आपले स्वतःचे काय आहे ? ते निर्माणकर्त्यावर वाहून त्याची पूजा करावी ? त्यापेक्षा जे सत्पुरुष जगाच्या कल्याणासाठी झटतात त्या सत्पुरुषांस फुलांच्या माळा करून नित्य ईश्वराच्या नावाने अर्पण केल्यास पुष्पाचे सार्थक झाले असे समजावे.

सध्या वृद्धाश्रमांची संख्या वाढत चाललेली आहे. तरुण पिढी वयोवृद्धआई-वडिलांची सेवा करण्याऐवजी धार्मिक विधी, धार्मिक यात्रा, पूजा, होम हवन, कर्मकांड यामध्ये अडकलेली आहे. आपल्या आईवडिलांकडे दुर्लक्ष करीत आहे व नामस्मरण, पूजाअर्चा यामध्ये अडकले आहेत. देवाचे नामस्मरण केल्याने देव संतुष्ट होत नाही किंवा प्रसन्न देखील होत नाही. आई-वडिलांची सेवा करण्याचे कर्तव्य पार केल्याने देव संतुष्ट होईल. याबाबत महात्मा फुले आपल्या सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकामध्ये म्हणतात, ''एखाद्या व्यक्तीला दहा मुले आहेत आणि त्या व्यक्तींनी त्या दाही मुलांना लहानाचे मोठे केले ते वयोवृद्ध झाले. तेव्हा थोरल्या मुलाने त्यांचे पालनपोषण न करता माझी आई, माझे वडील असे पोकळ नामस्मरण केले तर त्या आई-वडिलांना उपाशी मरावे लागेल परंतु दुसऱ्या मुलाने नामस्मरण करता त्या आईवडिलांचे पालनपोषण केले तर त्यांचे आईवडील सुखी होऊन आनंदी पावतील. तद्वत ढोंगी बैराग्याची सोंग घेऊन सर्वकाळ भांग पिऊन तिच्या अंमलांत अज्ञानी भोळ्याजणांचे मिष्ठान्नावर नित्य ताव देऊन लाल गाजरासारखे गलेलठ्ठ पडून निरर्थक निर्मिकाचे नामस्मरण करितात. तेव्हा आपण मानवांनी अशा भोंदू ढोंगी लोकांचे ऐकून निर्मिकाचे नामस्मरण देखील करू नये, त्यापेक्षा दिलेले कर्तव्य पार पाडावे. हेच खऱ्या अर्थाने स्मरण आहे ''

महात्मा फुले म्हणतात, नैवेद्य अथवा अन्नदान निर्मिकास दाखवून तृप्त करण्याऐवजी पंगु लोकास अथवा परक्या मुलास निर्मिकाच्या नावाने यथाशक्ती मदत करावी. निर्मिकाने या आपल्या पृथ्वीवर जलचर, स्थलचर व उभयचर अशा प्रकारच्या जीवांच्या तीन जाती निर्माण केल्या आहेत. त्यापैकी प्राणीमात्रात मानवप्राणी श्रेष्ठ आहे. त्यामध्ये स्त्री आणि पुरुष असे दोन भेद आहेत. या उभयांतांमध्ये जास्त श्रेष्ठ स्त्री आहे. कारण, तीच आपल्या सर्वांना जन्म देते. पालन पोषण करते. काळजी वाहते. चालायला बोलायला शिकवते. निरपेक्ष बुद्धीने सर्वांशी वागते. स्त्रिया पुरुषांवर जास्त प्रीती करतात, कारण पूर्वी कित्येक स्त्रिया सती देखील जात असत, परंतु पुरुषाला तिच्याविषयी दुःख होऊन तो कधी सता गेलेला ऐकला आहे काय? जसजसा मानव आधुनिकतेकडे चालेला आहे, तसातसा तो धर्माला जास्त चिटकू लागला आहे. पूर्वीच्या काळामध्ये जी शिवाशिवा होती, ती नष्ट झाली परंतु माणसाच्या मनातली जात अजून गेलेली नाही. धर्माबद्दलची तेढ वाढत चालली आहे. १७ मार्च २०२५ रोजी नागपूरमध्ये औरंगजेबाच्या थडक्याच्या हटवण्याच्या मागणीसाठी दोन समुदायांमध्ये हिंसक चकमकी झाल्या. फेब्रुवारी २०२५ मध्ये पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील अंत्रोली गावात विक्रम गायकवाड या उच्चशिक्षित बौद्ध मुलाने सप्टेंबर २०२४ मध्ये आंतरजातीय विवाह केला म्हणून त्याची ८ फेब्रुवारी २०२५ रोजी हत्या करण्यात आली. सध्या चित्रपटाच्या माध्यमातून देखील जाती-धर्माचे जाणीवपूर्वक राजकारण केले जाते. जे स्वराज्याचे रक्षक आहे त्यांना धर्मरक्षक म्हणून संबोधले जाते. चित्रपटातून राष्ट्रपुरुषांच्या कार्य कर्तृत्वांचा मागवा घेण्याऐवजी, नको त्या गोष्टींवर लोकांचे हेतुपुरस्सर लक्ष केंद्रित केले जाते. आता रस्त्यावर भाजी विकणारा, गवंड्याच्या हाताखाली काम करणारा, मोलमजुरी करून पोट भरणारा माणूस देखील धर्माची भाषा बोलू लागला आहे. धर्म टिकला पाहिजे असे बोलू लागला आहे. राजकीय पुढारी सामान्य जनतेला अमिष दाखवून स्वतःच्या खर्चातून धर्मयात्रा करीत आहेत. अष्टविनायक दर्शन, बालाजी दर्शन, मोहटादेवी दर्शन, आयोध्या दर्शन, शिर्डी दर्शन, कुंभमेळा अशा सहली काढत आहे. धर्म हा जोडण्यासाठी आहे हे न सांगता धर्माच्या नावाखाली धर्माधर्मात वितुष्ट आणण्याचे काम काही माणसे करीत आहेत. आता धर्मानुसार झेंड्यांचे रंग झाले आहेत. कोणत्याही धर्माच्या, झेंड्याचा रंग दिसला तरी सामान्य माणसाच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण होते. अशी परिस्थिती आलेली आहे की जात, धर्म, पंथ अधिक बलवान होत आहे.

धर्माबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना महात्मा फुले अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने सवाल करतात. ते म्हणतात, उत्पन्नाचे साधन म्हणून कपडे धुणे आणि त्यावर आपला उपजीविका करणे हा जर का परिटाचा धर्म असेल, तर आपण कधीकधी आपली स्वतःचीच वस्त्रे घरी धुत नाहीत काय ? उत्पन्नाचे साधन म्हणून आपल्या सर्वांच्या हजामती करून त्यावर उपजीविका करणे हा जर का न्हाव्याचा धर्म असेल तर, आपण नेहमी आपल्या नाजूक जागेचे केस बाजूला जाऊन भादरीत नाही काय? आपल्या सर्वांचे गुमूत काढून त्यावर आपला निर्वाह करणे हा जर हलालखोरांचा धर्म आहे, तर मग आपण आपल्या घरात बिछान्यावर पडलेल्या आजारी माणसांचा गु-मुत बाहेर टाकीत नाही काय? एखाद्या ठोंब्या आर्यभट्ट ब्राह्मणाने दुसऱ्याची शरणागती पत्करून त्याचा गु-मूत काढल्यास त्याला तुम्ही हलालखोर म्हणाल काय? जसे धनगरांनी मेंढरे पाळून त्यास चारणे हा त्याचा धर्म नव्हे, शेती कामे करणे हा कुळवाड्याचा धर्म नव्हे त्याचा उद्योग आहे. मळ्यामध्ये काम करणे माळ्याचा धर्म नव्हे उद्योग आहे. जोडा शिवणे हा चर्मकाराचा धर्म नव्हे धंदा आहे रखवाली करणे रामोशाचा धर्म नव्हे धंदा आहे. म्हणून ते आपल्या अखंडात म्हणतात..

सत्य सर्वांचे आदीघर सर्व धर्मांचे माहेर जगा माझी सुख सारे खास सत्याची बा पोरे सत्य सुखाला आधार बाकी सर्व अंधकार आजपर्यंत जी जी धर्मपुस्तके लिहिली गेली आहेत ते सत्पुरुषांनीच लिहिलेली आहे परंतु एखादे धर्मपुस्तक स्त्रीने लिहिलेले नाही ही शोकांतिका आहे. जे जे धर्म सद्यस्थितीत अस्तित्वात आहे ते आपल्या धर्मावरून व दुसऱ्याच्या धर्माविषयी सारासार विचार न करता माझा धर्म खरा आहे म्हणून बेलगामी हट्ट करून बसतात परंतु एकमेकांच्या धर्माविषयी सारासार विचार केल्याबरोबरच कोणीच कोणाच्या धर्माला खोटे म्हणणार नाही, असे महात्मा फुले म्हणतात. महात्मा फुले म्हणतात, सर्व स्त्रियांनी अथवा सर्व पुरुषांनी एकमेकात एकमेकांची कोणत्याच प्रकारची आवडनिवड न करता त्या सर्व स्त्री-पुरुषांनी या भूगोलावर आपले एक कुटुंब समजून एकमताने एकजुटीने एकमेकांशी सत्य वर्तन करून आपण सर्वांच्या निर्विकास संतोष देऊन आपण त्यांची आवडती लेकरे होता त्या सत्यवर्तन करणारे म्हणावेत. या भूमंडळावर महासत्पुरुषांनी जेवढी म्हणून धर्मपुस्तके केली आहेत. ती धर्मपुस्तके त्या सर्वात त्यावेळेस अनुसरून त्यांच्या समजूतीप्रमाणे काही ना काही सत्य आहे. यास्तव कोणत्याही कुटुंबातील एका मानव स्त्रीने बौद्धधर्मी पुस्तक वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तिने तो धर्म स्वीकारावा व त्याच कुटुंबातील तिच्या पतीने जुना व नवा करार वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास त्याने ख्रिस्ती व्हावे व त्याच कुटुंबातील त्यांच्या कन्येने कुराण वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तिने मोहम्मदी धर्मिय व्हावे आणि त्याच कुटुंबातील त्याच्या पुत्राने सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास त्याने सार्वजनिक सत्यधर्मी व्हावे. सत्यशोधक महात्मा फुले सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात म्हणतात, या सर्व माता-पित्यांसह कन्यापुत्रांनी आपला प्रपंच करीत असता प्रत्येकाने कोणी कोणाच्या धर्माचा हेवा अथवा द्वेष करू नये आणि त्यासर्वांनी आपण सर्व निर्माणकर्त्याने निर्माण केलेली लेकरे असून त्याच्याच म्हणजे निर्मिकाच्या कुटुंबातील आहोत, असे समजून प्रेमाने व गोडीगुलाबीने एकमेकांशी वर्तन करावे म्हणजे ते आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या राज्यात धन्य होतील. म्हणजेच सार्वजनिक धर्मपुस्तकात काही जर सत्य आहे तर या भूमंडळावर जेवढे म्हणून धर्म आहेत ते सार्वजनिक सत्याची लेकरे आहेत अशी माझी खात्री आहे.

आज आपण धुमधडाक्यात महात्मा फुलेंची जयंती करतो. मोठमोठे फ्लेक्स लावतो त्यांच्या नावाने विविध योजनांच्या घोषणा केल्या जातात. महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांना नुकताच भारतरत्न पुरस्कार देण्याची घोषणा झालेली आहे. त्याची श्रेय कोणाकडे यावर चर्चा सुरू आहे. एक जानेवारी १८४८ रोजी महात्मा फुले यांनी भिडेवाडा, बुधवार पेठ पुणे येथे पहिली दलित मुलींची शाळा सुरू केली. ही शाळा सुरू करण्यासाठी महात्मा फुले यांनी सोबत त्यांचे सर्व जातीधर्माचे मित्र देखील होते. मुलींची शाळा सुरू करण्यासाठी फुलेंनी त्यांच्या पत्नीला सावित्रीबाईंना शिकवले. महात्मा फुले यांच्या अनेक महत्वपूर्ण कार्यापैकी त्यांनी भारतातली पहिली दलित मुलींची शाळा सुरू केली, हे सर्वात महत्त्वपूर्ण कार्य असताना देखील पुण्यातील दगडूशेठ गणपती समोरील भिडेवाडा येथे जे प्रस्तावित स्मारक होत आहे. तेथे महात्मा फुले यांचे नाव डावलून त्या ठिकाणी फक्त क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले देशातील पहिली मुलींची शाळा असा पुणे महानगरपालिकेने बोर्ड लावलेला आहे. नुकताच महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना एकत्रित भारतरत्न पुरस्कार देण्याचे भारत सरकारने ठराव पास केलेला आहे केलेला आहे. त्याप्रमाणे पुण्यातून शिक्षणाची सुरुवात महात्मा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना सोबत घेऊन केली. त्याच पुणे विद्यापीठाला फक्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे नाव देण्यापेक्षा दोघांचे एकत्र नाव दिले असते तर ते अधिक उचित झाले असते. असे या महात्मा फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त म्हणावेसे वाटते.त्यावेळी विधवांना पुनर्विवाह करण्याची परवानगी नसल्याने अनेक जणींना वेश्या व्यवसाय पत्करावा लागत असे. त्यावेळी या स्त्रिया बाळांचा जीव घेत किंवा स्वतःच जीव देत, यापासून परावृत्त करण्यासाठी ज्योतिराव व सावित्रीबाई फुले यांनी स्वतःच्या राहत्या घरात स्वतः ची मिळकत, स्वतःच्या खर्चात पुरेशी नसताना १८८३ रोजी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. ३५ ब्राह्मण विधवांची बाळंतपणे खुद्द सावित्रीने केली. त्यातल्याच एका काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले, डॉक्टर केले आणि त्याला आपले कायदेशीर वारसदार केले. त्याच पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलला गर्भवतीच्या उपचारासाठी दहा लाख रुपये न देता आल्यामुळे तिचा मृत्यू झाला. पुण्यातील नामांकित रुग्णालयाला जीवापेक्षा पैसे महत्त्वाचा आहे का ? ज्या पुण्यात महात्मा फुले यांनी बाल प्रतिबंधक गृह निर्माण केले त्याच पुण्याची आजची अवस्था आहे. विधवांना केशवपन करून विद्रुप केले जाईल याविरुद्ध मोहिम हाती घेतली. नाभिक बांधवांना घेऊन संप केला. हा संप पगार वाढीसाठी नव्हता, तर हा संप मिळणारा अनैतिक पैसा. आम्हाला नको हे सांगण्यासाठी होता. या संपाची दखल लंडनमधील वृत्तपत्रांनी घेतली. त्याच महिला आज जय परशुरामच्या घोषणा देत आहेत.मग प्रश्न असा पडतो की खरंच आजच्या काळात फुले यांची जयंती साजरी करावी का ? जातीधर्माच्या नावाखाली आज सर्रास दंगली होत आहेत. मंदिर मज्जिद बांधण्याची प्रत्येकाची धडपड सुरू आहे. माणसाची जात कोणती यावरून माणूस ओळखला जातो. खरेतर फुलेंचा विचार त्यांची स्पष्ट वक्ता, भाषा आणि समाजात एकोपा व्हावा यासाठी असणारी तळमळ ही आजच्या काळाची महत्त्वाची गरज आहे. त्यांनी दिलेल्या समतेचा विचार हा अंधश्रद्धेवर आधारित नसून तो सत्यवर्तनावर आधारित आहे.सत्यशोधक धर्म म्हणजे सर्वधर्मसमभाव नव्हे तर सर्वधर्माची विश्लेषण असा अभिप्रेत आहे. भारतीय संविधानाप्रमाणे धर्मनिरपेक्ष आहे. महात्मा फुले ही केवळ एक व्यक्तीमत्व नाही, तर ते आजच्या काळातील सजग मार्गदाता आहे. त्यांच्या विचारांनीच समाज समृद्ध होऊ शकतो प्रगत होऊ शकतो.महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांनी समस्त सर्वच स्त्रियांसाठी, पुरुषांसाठी जे काम केलेले आहे, त्याबाबत प्रत्येक मानवाने कृतज्ञता दाखवून त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून कर्तव्य करणे काळाची गरज आहे. स्त्री पुरुष समानता याबाबत ज्योतिराव फुले आपल्या खंडात म्हणतात, स्त्री पुरुष निवड नसावी गुणे आदरावी सर्वकाळ एकोणीस शतकी ग्रंथ केला सिद्ध वाचोत प्रबुद्ध ज्योती म्हणे.

Friends of Rayat Samachar
इंडी जर्नल वाचण्यासाठी
QR code scan करा